# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १६/०३/२०२४ (शनिवार) सायंकाळ

---

### लोकसभा निवडणूक २०२४ संबंधाने नागपूर ग्रामीण जिल्हयातील रामटेक लोकसभा अंतर्गत ०६ विधानसभा क्षेत्राकरीता स्टॅटीक सर्विलेन्स टीम व भरारी पथक

### तसेच जिल्हयातील आंतरराज्य व आंतरजिल्हा चेक पोस्ट कार्यान्वित

नागपूर ग्रामिण जिल्हयातर्फे लोकसभा निवडणूक २०२४ संबंधाने करण्यात येत असलेली कार्यवाही १) ०९ ठिकाणी आंतरराज्य सीमेवर व आंतरजिल्हा सीमेवर ०७ ठिकाणी अवैध दारू, अंमली पदार्थ व शस्त्रे इत्यादी तपासणी करिता चेक पोस्ट कार्यान्वित करण्यात आलेली आहे. २) fst /sst पथक कार्यान्वित करण्यात आलेले आहे. ३) अवर्गीकृत V I P ची सुरक्षा काढुन घेण्यात आलेली आहे.

मा. भारत निर्वाचन आयोग यांचेकडुन लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला असुन सदर निवडणुक शांततेत व निर्भय वातावरणात पार पाडण्याकरीता नागपूर ग्रामीण जिल्हयातील ०९– रामटेक लोकसभा अंतर्गत ०६ विधानसभा क्षेत्राकरीता स्टॅटीक सर्विलेन्स टीम व भरारी पथक नेमण्यात आले असुन त्यामध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. दिनांक २६/०३/२०२४ रोजी पासुन नागपूर ग्रामीण जिल्हयामध्ये एकुण (F.S.T) चे एकुण पथक १८ तयार करून त्यामध्ये १८ अधिकारी व ५८ अंमलदार ची नेमणुक केली आहे. (S.S.T) स्टॅटीक सर्विलेन्स चे एकुण पथक १८ तयार करून त्यामध्ये ५४ अंमलदार ची नेमणुक केली आहे.

तसेच जिल्हयातील आंतरराज्य व आंतरजिल्हा चेक पोस्ट खालील दिलेल्या प्रमाणे आंतरराज्य व आंतरजिल्हा चेकपोस्ट दि. १६/०३/२०२४ चे १८.०० वा. पासुन कार्यान्वित असुन आंतरराज्य एकुणे ०९ चेकपोस्ट ०९ अधिकारी व ३६ अंमलदार, आंतरजिल्हा चेकपास्ट –०८ मध्ये ०८ अधिकारी व ३२ अंमलदार आहेत.

मा. नागपूर ग्रामीण पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार यांनी नागपूर ग्रामीण हद्दीमध्ये अवैध दारू व शस्त्र, जुगार तसेच इतर अवैध धंदयावविरूद्ध कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

# कोळसा चोरी करणारा आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

पोस्टे कन्हान अंतर्गत इंदर छटवाल कॅम्प के पास खदान नं. ३ कन्हान येथे दिनांक १५/०३/२०२४ चे ०५.०० वा. ते ०५.१५ वा. दरम्यान यातील **आरोपी नामे— अमरदिप अनील गजबिये, वय २१ वर्ष रा. गोंडेगाव** हा आपले मोटरसायकल ड्रिमयुगा क्र. एम. एच—४०/बिबी—५१०३ गाडीवर २ बोरी २०० किलो किं १५००/— रु चा कोळसा चोरी करुन नेतानी मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून ड्रिमयुगा क्र. एम. एच ४० बिबी ५१०३ गाडी किंमती १००००/—रू. असा एकूण ११५००/— रु. मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— संतोष इंदरा सिंग यादव, वय ३९ वर्ष, क्वा. नं ५२७ खदान नं. ३ मढीबाबा कॉलनी कन्हान यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर